# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)


क्र. मजनिप्रा/आस्था/संगणक/२०२५/६६०

दि.०७/१०/२०२६

**विषय - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी दोन संगणक खरेदी करण्याकरिता दरपत्रके मागविण्याबाबत...**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयासाठी दोन संगणक खरेदी करण्यासाठी पात्र सेवापुरवठादारांकडून कंपनीच्या/संस्थेच्या लेटरहेडवर सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | दोन संगणकांचा तपशील | परिशिष्ट - १ मध्ये नमूद केला आहे. |
| २ | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १५/१०/२०२६<br>वेळ : दुपारी ४ : ०० पर्यंत |
| ३ | दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. १५/१०/२०२६<br>वेळ : दुपारी ५ : ०० वाजता कार्यालयाच्या पत्त्यावर |

२. दरपत्रक पाठवताना तांत्रिक व आर्थिक दरपत्रके वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये पाठविण्यात यावे.

**१) लिफाफा क्र. १ : तांत्रिक दरपत्रक** - यामध्ये खालील कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

i) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ नुसार दुकानाची मुंबई येथील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

ii) कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र

iii) जी.एस.टी नंबरची छायांकित प्रत.

iv) पॅन कार्डची छायांकित प्रत.

v) संगणक पुरवठा क्षेत्रातील किमान १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र/आदेश.

vi) खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर हितसंबंधांचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल दरपत्रक सादर केल्याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर)

**२) लिफाफा क्र. २ : आर्थिक दरपत्रक** - यामध्ये संस्थेच्या लेटरहेडवर परिशिष्ट - १ नुसार संगणकांचे दर नमूद करण्यात यावेत.




9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005. | Tel.: +91-22-69372000 / 22152019
Email : mwrra@mwrra.in / mwrralibrary@yahoo.co.in | Website : www.mwrra.maharashtra.gov.in

३. संगणकांचे दर सर्व करांसह नमूद असावेत. सदरचे दर कराराच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहतील आणि त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

४. परिशिष्ट - १ मधील नमुन्यातच दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे, अन्यथा ते ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच, अंतिम दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेली तांत्रिक व आर्थिक दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

५. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांना कोणत्याही कारणाशिवाय दरपत्रके स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार राहतील.

६. ज्या संस्थांना महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहाराच्या कारणास्तव अपात्र (Blacklisted) ठरविले आहे, अशा संस्थांना दरपत्रके भरता येणार नाहीत.

७. दरपत्रके भरणाऱ्या संस्थांना आपल्या संस्थेचे नाव, पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक देणे आवश्यक राहील.

८. दरपत्रकात नमूद केलेल्या किंमतीमध्ये वस्तू कर (Taxes), वाहतूक खर्च (Transportation charges) आणि संगणकाचे इन्स्टॉलेशन शुल्क (Installation charges) या सर्व शुल्कांचा समावेश असावा. यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च देय राहणार नाही.

९. सेवापुरवठादाराने दरपत्रकात १ वर्षाची मूळ (Standard) OEM वॉरंटी आणि ४ वर्षांची विस्तारित (Extended) OEM वॉरंटी स्पष्टपणे नमूद करावी. तसेच विस्तारित वॉरंटी अधिकृत सेवा नेटवर्कमार्फतच असावी.

१०. Microsoft Windows आणि Microsoft Office चे परवाने (Licenses) अधिकृत आणि कायदेशीररित्या परवानाकृत असावेत.

११. सेवापुरवठादाराने जेथे आवश्यक असेल तेथे परवान्यांचा (Licenses) तपशील अधिकृत असल्याचा पुरावा सादर करावा.

१२. पायरेटेड, अनधिकृत किंवा विनापरवाना सॉफ्टवेअर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

(सुनिल काळे)
सचिव, मजनिप्रा

**परिशिष्ट - १**

दरपत्रक सादर करण्याकरिता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर)

दिनांक: --/--/२०२६

प्रति,
**सचिव,**
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
९ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर - १,
कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

**विषय**:- दोन संगणक खरेदी करण्याबाबतचे दरपत्रक...

**संदर्भ**:- मजनिप्रा/आस्था/संगणक/२०२६/६६०, दि.०७/१०/२०२६.

**महोदय,**

मी/आम्ही उपरोक्त नमूद केलेले काम, दरपत्रक सूचनांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच दरपत्रक सूचनांमध्ये नमूद विनिर्दिष्ट कामाकरिता अदा करावयाच्या देय रकमेचा विचार करून खाली दर्शविलेल्या दरानुसार खरेदी कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहोत;

| Sr. No. | Name of the Item | Qty | Cost per quantity | Tax If any | Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | All in One PC - Processor- Intel Core TM 3 100 U or Higher, Genuine Microsoft Window 11 Pro 64 bit, Minimum 8 GB DDR5, 5200 MT/s or higher, Minimum 512 GB M.2 PCle NVMe SSD, 23.8 Inches Full HD, Anti-Glare, Non Touch Display, Integrated Intel Graphics or better, Gigabit Ethernet (LAN), Wi-fi and Bluetooth, integrated Stereo Speakers and Microphone, All accessories like Keyboard, Mouse, Power Adapter, cables etc, TPM 2.0 secure Boot and standard OEM security features, 1 year standard warranty from date of Installation and 4 year Extended Warranty (Along with OEM authorized services and technical support throughout the warranty period, Window 11 Home, Microsoft Office 24 (lifetime free) | 2 | | | |

आम्ही दरपत्रक सूचनेतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे नियम व कायदे वाचले असून ते आमच्यावर बंधनकारक आहेत.

आपला विश्वासू,

दरपत्रक धारकाची सही

दिनांक:- /--/२०२६.

नाव:-

पत्ता:-

साक्षीदार:-